Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multididiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

28Th January 2019 Special Issue – 106

# The Changing Role of the Welfare State in the Last Two Decades

**Chief Editor**
**Dr. Dhanraj T. Dhangar**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
**Dr. A.M. More**
**Dept. of Economics**
**Vasundhara College, Ghatnandur,**
**Tq. Ambajogai, Dist. Beed**

Scanned with OKEN Scanner

16. Recent Trends In Indian Banking Sector — 63
**Rajesh G. Umbarkar**

17. Indian Economy And Agriculture — 67
**Prof Satarle Sham Laxman**

18. A Review Of Indian Banking Sector And Role Of GovernmentIn Its Development. — 69
**Ms. Satya Kishan**

19. MGNREGA and Migration Reduction -A Studyin Bidar District of Karnataka — 73
**Dr. Jaibharat Madivalappa Mangeshkar**

20. Roll Of Indian Government In External Debt Management — 80
**Aboli Gangadhar Joshi**

21. भारतीय वाणिज्यिक बैंकों का विलय एवं अधिग्रहण एक अध्ययण — 84
**डॉ. सुर्यकांत त्र्यं. पवार**

22. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे योगदान — 86
**प्रा. डॉ. मोरे ए.एम.**

23. शेती विकासाकरीता पंतप्रधान पिक विमा योजना एक विश्लेषणात्मक अध्ययन — 88
**डॉ. संजय धनवटे, डॉ. महेन्द्र गावंड**

24. भारतातील स्त्री-पुरूष गुणोत्तरातील असमतोल : कारणे व उपाय — 91
**अमोल एस. शिंदे, श्री सावंत बी. एस.**

25. भारतीय शेतीचीवास्तविकता आणि शासन — 96
**डॉ.महादेवी वैजनाथ फड, डॉ. दिपक महोदव भारती**

26. महाराष्ट्र राज्यातील कृषी पर्यटनातील अर्थसंधी : एक अभ्यास — 98
**श्री.इंद्रजीत रामदास भगत**

27. भारतातील 2014 नंतरच्या कल्याणकारी योजना — 101
**प्रा. डॉ. किशन सत्ताजी वाभुळगावकर**

28. महिलांचे सक्षमीकरण : एक आढावा — 103
**श्रीमती. देशमुख के. एस.**

28. जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या खर्च प्रवृत्तीचा अभ्यास — 106
- विशेष संदर्भ औरंगाबाद जिल्हा-
**डॉ. सुनिल अण्णा गोरडे**

२९. जागतिकीकरण आणि भारतीय शेतीची दशा आणि दिशा — 108
**डॉ.नासिकेत गोविंदराव सुर्यवंशी**

30. भारतीय अर्थव्यवस्थेतील सरकारची बदलती भूमिका — 110
**डॉ वाय. वी. चव्हाण**



Scanned with OKEN Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) – 0.676 | Special Issue - 106 | January 2019 | UGC Approved No. 40705
The Changing Role of the Welfare State in the Last Two Decades

# भारतातील स्त्री-पुरूष गुणोत्तरातील असमतोल : कारणे व उपाय

संशोधक
अमोल एस. शिंदे
अर्थशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

संशोधक
श्री सावंत बी. एस.
वाणिज्य विभाग
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

**प्रस्तावना :**

भारत जगातील एक विकसनशील राष्ट्र म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाने अनेक क्षेत्राचा झपाट्याने विकास साध्य केला आहे. तरी परंतु भारतामध्ये अनेक समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने लोकसंख्या वाढ, दारिद्र्य, कुपोषण, बेकारी, रोगराई, बालगुन्हेगारी, इ. समावेश होतो. भारतामध्ये ज्या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत त्या प्रामुख्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे निर्माण झाल्या आहेत. भारताचा जगामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत दुसरा क्रमांक लागतो. चीन नंतर सर्वाधिक लोकसंख्या ही भारतात असून 2011 च्या जनगणनेनुसार 121.8 कोटी पेक्षा जास्त असून जागतिक लोकसंख्येच्या 16.7 टक्के इतकी लोकसंख्या भारतामध्ये आहे. तर केवळ एकुण जागतिक जमिनीपैकी 2.4 टक्के जमीन भारताच्या वाट्याला आली आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारताचा जगामध्ये सातवा क्रमांक लागतो. भारतातील वाढणाऱ्या लोकसंख्येचा परिणाम विकासावरती देखील झाला आहे.

**लोकसंख्येचा आकार व वृद्धी :**

मार्च 2011 मध्ये भारताची लोकसंख्या ही 121.8 कोटी इतकी होती. त्यापैकी पुरूषांची संख्या 66.4 कोटी व स्त्रियांची संख्या 55.4 कोटी इतकी होती. भारताची लोकसंख्या प्रामुख्याने चार टप्प्यात विभागली जाते. ती खालीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

1. 1891 ते 1921 स्थीर लोकसंख्या
2. 1921 ते 1951 स्थिर व वेगाने वाढणारी लोकसंख्या
3. 1951 ते 1981 अत्यंत वेगाने वाढणारी लोकसंख्या
4. 1981 ते 2011 वेगाने वाढीबरोबरच लोकसंख्या वाढ दरामध्ये घट

**भारताची लोकसंख्या**

| वर्ष | लोकसंख्या | दशवार्षिक वाढ | शेकडा वाढ |
|---|---|---|---|
| 1911 | 25 कोटी 21 लाख | 1 कोटी 37 लाख | 5.7 टक्के |
| 1921 | 25 कोटी 13 लाख | – 8 लाख | – 0.4 टक्के |
| 1931 | 27 कोटी 90 लाख | 2 कोटी 77 लाख | 11.0 टक्के |
| 1941 | 31 कोटी 87 लाख | 3 कोटी 97 लाख | 14.2 टक्के |
| 1951 | 36 कोटी 11 लाख | 4 कोटी 24 लाख | 13.3 टक्के |
| 1961 | 43 कोटी 92 लाख | 8 कोटी 13 लाख | 21.6 टक्के |
| 1971 | 54 कोटी 82 लाख | 9 कोटी 90 लाख | 24.8 टक्के |
| 1981 | 68 कोटी 33 लाख | 13 कोटी 51 लाख | 24.7 टक्के |
| 1991 | 84 कोटी 63 लाख | 16 कोटी 30 लाख | 23.8 टक्के |
| 2001 | 102 कोटी 76 लाख | 18 कोटी 7 लाख | 21.3 टक्के |
| 2011 | 121 कोटी 1 लाख | 19 कोटी 71 लाख | 21.4 टक्के |

**लोकसंख्येची घनता :**

दर चौ.कि.मी. मध्ये राहणाऱ्या लोकांचे प्रमाण म्हणजे लोकसंख्येची घनता होय. भारतात लोकसंख्या वाढीबरोबरच घनतेमध्ये देखील वाढ झाली आहे. 1901 साली भारतात लोकसंख्येची घनता ही 77 इतकी होती. 2001 मध्ये ही घनता 324 इतकी झाली. पश्चिम बंगाल सर्वाधिक घनतेचे राज्य आहे. 2001 मध्ये लोकसंख्येची घनता ही 903 प्रती चौ.कि.मी. इतकी होती. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची घनता ही 382 इतकी होती. सर्वाधिक घनता ही दिल्लीची होती 11297 इतकी होती. तर सर्वात कमी अरूणाचल प्रदेशाची 17 इतकी होती.

**साक्षरता :**

दर हजार लोकसंख्येमागे किती लोकसंख्या साक्षर आहे याच्या आधारे एकूण साक्षरतेचे प्रमाण काढले जाते. 1951 मध्ये भारतातील केवळ 18.3 टक्के लोकसंख्या ही साक्षर होती. तर 1971 साली हे प्रमाण 34.5 टक्के इतके झाले. तर 2011 साली हे प्रमाण 74.04 टक्के इतके झाले.

**भारतातील साक्षरता प्रमाण**

| वर्ष | लोकसंख्या | दशवार्षिक वाढ | शेकडा वाढ |
|---|---|---|---|
| 1951 | 18.3 टक्के | 27.2 टक्के | 8.9 टक्के |
| 1961 | 28.3 टक्के | 40.4 टक्के | 15.3 टक्के |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 1971 | 34.5 टक्के | 46.0 टक्के | 22.0 टक्के |
| 1981 | 43.4 टक्के | 56.4 टक्के | 29.8 टक्के |
| 1991 | 52.1 टक्के | 63.9 टक्के | 39.4 टक्के |
| 2001 | 65.38 टक्के | 75.96 टक्के | 54.28 टक्के |
| 2011 | 74.04 टक्के | 82.14 टक्के | 65.46 टक्के |

**लोकसंख्येतील स्त्री-पुरूष प्रमाण :**

लिंग गुणोत्तर म्हणजे दर हजार पुरूषामागे स्त्रीयांचे असणारे प्रमाण होय. हे गुणोत्तर समाजातील स्त्री-पुरूषामध्ये असलेली विषमता दर्शविणारा एक निर्देशक आहे. भारतामध्ये स्त्री-पुरूष गुणोत्तरामध्ये खुप मोठ्या प्रमाणात असमतोल निर्माण झाला आहे. भारतामध्ये लिंग गुणोत्तरामध्ये तफावत निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे स्त्री-अर्भक मृत्युचे प्रमाण जास्त असल्याने भारतातील स्त्रीयांचे प्रमाण घटले आहे. भारतात लिंग परिक्षण विरोधी कायदा झाला असला तरी आजही मोठ्या प्रमाणात स्त्री-भ्रुण हत्या घडून येत आहेत. त्यामुळे भारतातील स्त्रीयांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण कमी झाले आहे. 1991 मध्ये लिंग गुणोत्तर हे 927 इतके होते. तर 2001 मध्ये हे प्रमाण 933 इतके झाले. तर 2011 च्या जनगणनेनुसार हे प्रमाण 940 झाले आहे.

**भारतातील स्त्री-पुरुष प्रमाण**

| वर्ष | स्त्री-पुरूष प्रमाण दर हजारी |
|---|---|
| 1901 | 972 |
| 1911 | 964 |
| 1921 | 955 |
| 1931 | 950 |
| 1941 | 945 |
| 1951 | 946 |
| 1961 | 941 |
| 1971 | 930 |
| 1981 | 934 |
| 1991 | 927 |
| 2001 | 933 |
| 2011 | 940 |

स्त्री-पुरूष गुणोत्तरामध्ये राज्य निहाय खुप मोठा फरक दिसून येतो. 2001 च्या जनगणनेनुसार केरळ मध्ये हे प्रमाण 1058 इतके होते तर हरियाणा मध्ये 861, पंजाब मध्ये 875 तर उत्तर प्रदेश मध्ये 898 इतके होते. 2011 च्या जनगणनेनुसार केरळमध्ये हे प्रमाण 1084 तर सर्वात कमी दमण दिव मध्ये 618 इतके होते.

**जगातील प्रमुख देशातील स्त्री-पुरूष प्रमाण**

| देश | स्त्री-पुरूष प्रमाण दर हजारी पुरूषामागे |
|---|---|
| अरब अमीरात | 513 |
| कतार | 544 |
| बहरिन | 741 |
| सौदी अरेबिया | 840 |
| पॅलेस्टाईन | 885 |
| युक्रेन | 1149 |
| रशिया | 1136 |
| पोर्तुगाल | 1075 |
| लिथुनिया | 1124 |
| पोरूनिका | 1075 |
| भारत | 940 |

जगामध्ये सर्वात कमी स्त्रियांचे प्रमाण हे अरब अमिरात या राष्ट्रामध्ये केवळ 513 इतके आहे. तर सर्वात जास्त स्त्रियांचे प्रमाण हे युक्रेन या राष्ट्रामध्ये आहे. तर भारतामध्ये 2001 नुसरा दर हजारी स्त्रियांचे प्रमाण हे 940 इतके आहे. प्रगत राष्ट्रामध्ये स्त्री-पुरूष प्रमाणाबाबत तेवढी तफावत आढळत नाही. म्हणजेच बऱ्याच प्रगत राष्ट्रामध्ये स्त्रीयांचे प्रमाण हे पुरूषाच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. तर बऱ्याच अविकसनशील देशामध्ये उदा. भारत, इराण, मलेशिया, श्रीलंका, पाकिस्तान या देशामध्ये स्त्रियांचे एकुण लोकसंख्येतील प्रमाण खुपच कमी आहे.



Scanned with OKEN Scanner

**लिंग गुणोत्तर निश्चित करणारे घटक (Determinates of Sex Structure) :**

कोणत्याही देशामध्ये लिंग गुणोत्तर हे पुढील तीन घटकांद्वारे निश्चित केले जाते.

**1) नवजात बालकांचे लिंग गुणोत्तर :**

जैविक दृष्ट्या स्त्री व पुरूष यांचे जन्मप्रमाण कोठेही सारखे नाही. हे प्रमाण 1:1 असे नसते. निसर्गतः मुलीच्या जन्मापेक्षा मुलाच्या जन्माचे प्रमाण हे जास्त असते. सामान्यतः मुली व मुले यांचे लिंग गुणोत्तर 1000 मुलीस 1050 ते 1060 मुले इतके असते. अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन या देशामध्ये नवजात बालकाचे लिंग गुणोत्तर जास्त आहे. तर भारत फिलिपाईन्स या राष्ट्रास अर्भक मृत्यू प्रमाण जास्त आहे.

**2) मृत व्यक्तीचे लिंग गुणोत्तर :**

जगामध्ये स्त्रियांच्या मृत्युपेक्षा पुरूषांच्या मृत्युचे प्रमाण हे जास्त आहे. उदा. संयुक्त संस्थाने, जपान, ब्रिटन, सिंगापूर, इ. देशात पुरूषांचे मृत्यु प्रमाण जास्त आहे. भारतात जन्मानंतर 1 ते 7 दिवस व 7 ते 28 दिवसाच्या आत मृत्यु पावणाऱ्या बालकांत स्त्रियापेक्षा पुरूषाचे प्रमाण जास्त आहे. भारतामध्ये 15 ते 35 वयोगटातील माता मृत्यु प्रमाण अधिक असून हे प्रमाण प्रामुख्याने कुपोषण, आरोग्य विषयक असुविधा इ. कारणामुळे जास्त आहे.

**3) स्थलांतरीतांचे लिंग गुणोत्तर :**

स्थलांतरीताच्या प्रमाणामध्ये स्त्रियापेक्षा पुरूषाचे प्रमाण जास्त असते. भारतामध्ये अंतर्गत स्थलांतरामध्ये 70 ते 75 टक्के स्थलांतर हे ग्रामीण - नागरी स्वरूपाचे आहे. परिणामी शहरात पुरूषाचे प्रमाण जास्त असते.

**भारतातील लैंगिक गुणोत्तर - स्त्रियांचे घटते प्रमाण :**

लैंगिक गुणोत्तर हे देशाच्या लोकसंख्येचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भारताच्या लैंगिक गुणोत्तराचा विचार केला असता भारतातील स्त्रियाच्या प्रमाणात मोठी घट होत आहे. ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे सामाजिक दृष्ट्या व मानवी विकासाच्या दृष्टीने खुप मोठी चिंता निर्माण झाली आहे. 1991 च्या जनगणनेनुसार स्त्रियांच्या संख्येत वाढ झाली असली तरी ती खुपच कमी आहे. जागतिक सरासरीच्या मानाने ही संख्या खुपच कमी आहे. जागतिक सरासरी गुणोत्तर हे 986 इतके आहे.

स्त्री-पुरूष गुणोत्तराच्या बाबतीत भारतामध्ये खुप मोठा असमतोल निर्माण झाला आहे. 2001 च्या जनगणनेनुसार 18 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात हे गुणोत्तर भारताच्या सरासरीपेक्षा 933 अधिक होते. तर 7 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये हे गुणोत्तर राष्ट्रीय सरासरी पेक्षा कमी आहे. केंद्रशासित प्रदेशामध्ये लैंगिक गुणोत्तर हे 800 पेक्षा कमी आहे. शहरी भागात हे प्रमाण 900 तर ग्रामीण भागात हे प्रमाण 946 इतके आहे. केरळ, पाँडेचेरी, मनिपूर या राज्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या प्रमाणापेक्षा कमी आहे.

| लैंगिक गुणोत्तर | जिल्ह्यांची संख्या |
|---|---|
| 800 पेक्षा कमी | 9 |
| 800 ते 849 | 39 |
| 850 ते 899 | 116 |
| 900 ते 949 | 193 |
| 950 ते 999 | 162 |
| 1000 पेक्षा जास्त | 74 |
| **एकूण** | **593** |

0 ते 6 वयोगटातील बालकांच्या स्त्री-पुरूष प्रमाणामध्ये देखील भारतामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश या राज्यमध्ये त्याचप्रमाणे गुजरात, दिल्ली या राज्यामध्ये मुलींचे प्रमाण खुप कमी असल्याने विपरीत परिस्थिती निर्माण झाली आहे.

**0 ते 6 वयोगटातील जिल्ह्यानुसार गुणोत्तर**

| लैंगिक गुणोत्तर | जिल्ह्यांची संख्या |
|---|---|
| 800 पेक्षा कमी | 14 |
| 800 ते 849 | 35 |
| 850 ते 899 | 69 |
| 900 ते 949 | 217 |
| 950 ते 999 | 280 |
| 1000 पेक्षा जास्त | 8 |

**लैंगिक गुणोत्तरात असमतोल निर्माण होण्याची कारणे :**

भारतामध्ये 0 ते 6 वयोगटातील मुलीच्या प्रमाणात घट होत असून त्याचे मोठ्या प्रमाणात सामाजिक परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुलींचे प्रमाण घटण्यामागे अनेक प्रकारची कारणे आहेत.

**1) पुरूष प्रधान समाज रचना :**

आजही भारतामध्ये पुरूषप्रधान समाजरचना अस्तित्वात असून त्यामुळे मुलगा हवाच ही मानसिकता मोठ्या प्रमाणात आढळून येते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा त्यामुळे मुलगा व मुलगी यांच्यामध्ये भेद करण्यात येतो.



Scanned with OKEN Scanner

**2) स्त्री-भ्रुण हत्या :**

भारतामध्ये स्त्री-भ्रुण हत्येचे प्रमाण खुप मोठे आहे. अनेक ठिकाणी गर्भजल परीक्षेद्वारे लिंग निश्चिती करून स्त्री-भ्रुण हत्या करण्याचे प्रकार घडून येतात. उदा. महाराष्ट्रातील बीड, कोल्हापूर हे जिल्हे या बाबतीत आघाडीवर आहेत. गर्भजल लिंग विरोधी कायदा असूनही त्याची कसोशिने अंमलबजावणी होत नाही.

**3) आरोग्याकडे दुर्लक्ष :**

आरोग्याच्या बाबतीत अनेक कुटूंबामध्ये मुलगा मुलगी असा भेद केला जातो. त्यामुळे मुलाच्या पोषणाकडे अधिक लक्ष दिले जाते. त्यामुळे मुलींच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्याचा परिणाम बालमृत्युचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

**4) अपत्यप्राप्ती प्रमाण :**

जेंव्हा अपत्य प्राप्तीचे प्रमाण कमी होते तेंव्हा मुलांना अपत्य म्हणून अधिक प्राधान्य दिले जाते.

**5) स्त्री सुरक्षितता :**

समाजातील स्त्रियाची सुरक्षितता व शिक्षण याचा देखील प्रभाव लैंगिक गुणोत्तरावरती पडत असतो. स्त्रियासाठी असुरक्षित वातावरण असेल तर मुलांना अधिक प्राधान्य दिले जाते. शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यास स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्वरूपाचे स्थान मिळते.

**6) शैक्षणिक प्रसार :**

भारतात आजही ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचा प्रसार पुरेशा प्रमाणात झालेला नाही, त्यामुळे त्याचा प्रभाव हा लैंगिक गुणोत्तरावर पडला आहे. शिक्षणाच्या अभावामुळे स्त्रियातील साक्षरतेचे प्रमाण देखील कमी आहे.

वरील कारणांमुळे भारतामध्ये मोठ्या प्रमाणात लिंग गुणोत्तराच्या बाबतीत असमतोल निर्माण झाला आहे.

**लिंग गुणोत्तराचा सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील परिणाम :**

स्त्री-पुरूषातील असमतोलामुळे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रावरती खुपच दुरगामी परिणाम झाले आहेत. पुरूषापेक्षा स्त्रियाचे प्रमाण कमी असल्यास अत्याचार, वेश्या व्यवसाय, परस्त्रीगमण, विवाह स्थिती, कौटुंबिक मतभेद, अशांतता यासारखे गंभीर स्वरूपाचे प्रश्न निर्माण होतात. स्थलांतरामुळे मोठ्या प्रमाणात वेश्या व्यवसायात वाढ होते. त्याचप्रमाणे विवाह हा खर्चाचा व जबाबदारीचा भाग असल्याने दलालामार्फत मुलीच्या विक्रीची गंभीर समस्या मोठ्या शहरातून निर्माण झाली आहे. मुंबई, पुणे, कलकत्ता या शहराकडे दक्षिण भारतातून येणाऱ्यांचे प्रमाण खुप मोठे आहे. असे पुणेकर व राव यांनी 1962 च्या पाहणीतून स्पष्ट केले आहे.

भारतातील सामाजिक सांस्कृतिक परिस्थिती ही स्त्रियांच्या जीवीतास अनुकूल सार्वत्रिक मृत्युदराच्या बाबतीत मात्र पुरूषापेक्षा स्त्रियांच्या जिवीताचे धोके अधिक असतात. भारतातील स्त्रियांना मृत्युदर कमी असल्याचे फायदे मिळत नाहीत. भारतामध्ये स्त्री-पुरूषांच्या मृत्युतेतील भिन्नता फार मोठी आहे. याऊलट श्रीलंका, फिलीपाईन्स, थायलंड या देशांमध्ये स्त्री-पुरूष मृत्युतेत फारशी भिन्नता नसल्याने तेथील लिंग गुणोत्तर विकृत नाही.

भारतातील स्त्रियांचा मृत्युदर अधिक असल्यामागे स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा हे कारण असावे असा निष्कर्ष निघतो. भारतात स्त्री संतती विविध कारणांनी नकोशी असते. मुलांच्या तुलनेने मुलींचे संगोपन व्यवस्थित केले जात नाही.

त्याचप्रमाणे स्त्रियांचे प्रमाण कमी असल्या कारणाने स्त्री ही आजच्या जगामध्ये सुरक्षित नाही असे म्हटले जाते कारण प्रमाण कमी असल्याने स्त्रियांच्या अत्याचारामध्ये खुप मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

थोडक्यात भारतातील लिंग गुणोत्तर पुरूषप्रधान असण्यामागे स्त्रियांची पुरूषापेक्षा जास्त असणारी मृत्युता कारणीभूत आहे. मृत्युदरातील या घसरणीचा फायदा स्त्रियापेक्षा पुरूषांनाच अधिक प्रमाणात मिळतो. गेल्या अनेक वर्षापासून 34 वर्षापेक्षा जास्त वयोगटातील आकारमान कमी होत आहे. भारतात पुरूषापेक्षा स्त्रियांची मृत्युसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

**लिंग गुणोत्तरातील असमतोल दूर करण्याचे उपाय :**

भारतातील लिंगगुणोत्तरातील असमतोल दुर करण्यासाठी पुढील उपायाचा प्रामुख्याने विचार केला जातो.

**1) उत्तम वैद्यकीय सुविधा :**

भारतामध्ये आज ग्रामीण भागामध्ये पाहिजे त्या प्रमाणात वैद्यकीय सुविधा निर्माण झालेल्या नाहीत. असमतोल दुर करण्यासाठी देशामध्ये उत्तम प्रकारच्या आरोग्य विषयक सोयी उपलब्ध झाल्या तर निश्चितच ग्रामीण भागातील अर्भक मृत्यु यांचे प्रमाण कमी होईल.

**2) सकस आहाराचा पुरवठा :**

स्त्री-पुरूष प्रमाणात असमतोल निर्माण होण्यामध्ये सकस आहाराचा अभाव हे एक कारण आहे. असमतोल दुर करण्यासाठी शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागामध्ये देखील सकस आहाराचा पुरवठा होणे आवश्यक आहे. त्यामुळे माताचे आरोग्य सुधारेल. त्यामुळे माता मृत्यु व बाल मृत्यु प्रमाण कमी होईल.

**3) शिक्षणाचा प्रसार :**

शिक्षणाच्या प्रसारामुळे लोकांच्या रूढी व अंधश्रद्धा कमी होण्यास मदत होते. त्याबरोबर शिक्षणामुळे स्त्री व पुरूष यातील भेद कमी होतो. त्याच बरोबर वैज्ञानिक दृष्टीकोन तयार होतो. त्याचा परिणाम स्त्रीयांच्या मृत्युदरात मोठी घट होते आहे.

**4) शुद्ध पाण्याचा पुरवठा :**

आज भारतामध्ये अनेक गावामध्ये व शहरामध्ये शुद्ध पाण्याचा अभाव आहे. त्यामुळे कॉलरा, उलटी, जुलाब यांसारख्या रोगाने मोठ्या प्रमाणात मृत्यु होतो. सरकारने शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिल्यास मृत्युचे प्रमाण कमी होऊन लिंग गुणोत्तरातील असमतोल दुर होईल.



Scanned with OKEN Scanner

**5) माता बाल संगोपन :**

लिंग गुणोत्तराचे प्रमाण कमी करण्यासाठी माता व बाल आरोग्य चांगले राहणे आवश्यक आहे. 1971 साली दर हजारी बाल मृत्यु प्रमाण हे 105 होते तर 2001 साली हा दर 42 इतका होता. याचाच अर्थ माता व बाल संगोपनाच्या बाबतीत लोकांमध्ये मोठी जागृती निर्माण होत आहे.

**6) लिंग निदान चाचण्यावर बंदी :**

10 मे 1988 साली गर्भलिंग निदान विरोधी कायदा अस्तित्वात आला. परंतु या कायद्याची कठोर अंमलबजावणी आजही होताना दिसत नाही. या कायद्याची कठोर अंमलबजावणी केली तर निश्चितच स्त्री-भ्रुण हत्येचे प्रमाण कमी होईल. भ्रुण हत्या करणारास कडक शिक्षा सुनावली तर भ्रुणहत्या कमी होतील.

**7) सामाजिक प्रबोधन :**

लिंग गुणोत्तर संतुलित करण्यासाठी सामाजिक प्रबोधन होणे देखील आवश्यक आहे. लोकांमध्ये प्रसार माध्यमे (रेडिओ, दुरदर्शन) त्याचप्रमाणे वेगवेगळ्या सामाजिक संस्थांच्या माध्यमातून जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ :**

1) भारतीय अर्थव्यवस्था : प्रा. के. एच. ठक्कर.
2) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था : प्राचार्य डॉ. मंगला जंगले.
3) मानवी व प्रादेशीक भुगोल : ए. बी. सबदी, पी. एस. कोळेकर
4) लोकसंख्या : प्रा. आहिरराव, प्रा. अलीझाड, प्रा. धापटे, प्रा. वराट.
5) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था : डॉ. माधव बिराजदार
6) Indian Economy : Dr. P. K. Dhar
7) Part II Census of India : 2011
8) Internet

Scanned with OKEN Scanner